महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

---

**परिपत्रक :**

जा.क्र.तं.शि.विकापु/विवि-१/वनमहोत्वव/२०२१/ 2887
दिनांक : 08 JUL 2021

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सांगली जिल्हयातील सर्व पदविका, पदवी व
पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- सन २०२१ च्या पावसाळयात लागवड करावयाच्या रोपांबाबत**

संदर्भ :- १. उपवनसंरक्षक, सांगली वन विभाग यांचे पत्र जा.क्र.ब/कक्ष/योजना/२०२१-२२/६०९, दि. ०५.०७.२०२१
२. महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शा.नि.क्र.सावधि-२०२१/प्र.क्र.२०/फ-११, दि. ०४.०६.२०२१

उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र. १ चे पत्र या विभागीय कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्राची छायांकित प्रत सोबत जोडली आहे. प्रात पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, दिनाक १५ जून २०२१ ते ३० सप्टेंबर, २०२१ हा कालवधी शासनाने "वनमहोत्सव" म्हणून जाहीर केलेला आहे. सदर कालावधी दरम्यान वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडून सर्वांना सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध आहेत. तसेच ज्या शासकीय यंत्रणांकडे अनुदान उपलब्ध नाही अशा यंत्रणांना विहीत नमुन्यात अर्ज दिल्यानंतर मोफत रोपे देण्याची तरतूद आहे. याबाबत निर्गमित झालेल्या संदर्भिय शासन निर्णयाची छायांकित प्रत व त्यासोबत मोफत रोपे मागणीबाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज सहपत्रित करणेत आलेला आहे..

सद्यस्थितीत सांगली जिल्हयातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला असल्याने, वृक्ष लागवडी योग्य परिस्थिती तयार झालेली आहे. त्यामुळे जिल्हयातील वृक्षांदन वाढविण्याकरीता या कार्यात उत्सफूर्तपणे सहभागी होण्याविषयी सदर पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. त्याकरीता सर्व गांव / तालुकास्तरीय यंत्रणांनी वृक्षलागवड करण्याकरीता खड्डे खोदल्यानंतर मा. उपवनसंरक्षक, सांगली वन विभाग यांचे कार्यालयात रोपे मागणी अर्ज सादर करावा. जेणेकरुन त्याची दर गुरुवारी साप्ताहिक दखल घेऊन जवळच्या रोपवाटीकेतून दर शुक्रबारी रोपे वाटप करण्यात येईल.

आपल्या अर्जाची मूळ प्रत खास व्यक्तीमार्फत तर आगाऊ सूचना म्हणून ई-मेलव्दारेही देता येईल. त्याकरीता सदर कार्यालयाचा ई-मेल dycfsangli@gmail.com असा आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रम नियंत्रण कक्षात उपलब्ध श्री. एस. एस. खोत, लेखापाल यांचेमार्फत अर्ज नोंद व वाटपाचे दस्तऐवज ठेवण्यात येत असून, त्यांचा भ्रमणध्वनी क्र. ९१७५४४२७६६ असा आहे.

तरी या पत्राव्दारे सांगली जिल्हयातील सर्व संस्थाप्रमुखांना सूचित करण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने **" वनमहोत्सव २०२१-२२"** या कालावधीत वृक्षलागवड करण्याकरीता **तात्काळ** कार्यवाही करण्यात यावी तसेच खोदलेल्या खड्डयांची माहिती (फोटोसहीत) व त्यात लावलेल्या रोपांची माहिती (फोटोसहीत) वन विभागाच्या **vanyuktshivar 4.2** या मोबाईल ॲपव्दारे अपलोड करावी .

सोबत : संदर्भ क्र. १ व २ च्या छायांकित प्रती.

(डॉ द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : मा. उपवनसंरक्षक, सांगली वन विभाग यांचे कार्यालय, वन वसाहत, हनुमान नगर, कुपवाड, ता. मिरज, जि. सांगली – ४१६४३६ यांना संदर्भ क्र. १ येथील पत्राच्या अनुषंगाने माहितीकरीता अग्रेषित.

महाराष्ट्र शासन
वन विभाग

दुरध्वनी क्र.:-०२३३, २३४४६३९ उपवनसंरक्षक, सांगली वन विभाग यांचे कार्यालय
ई मेल-dycfsangli@gmail.com वन वसाहत, हनुमान नगर, कुपवाड, ता. मिरज जि. सांगली ४१६ ४३६

---

जा.क्र.ब/कक्ष-/योजना/२०२१-२२/609 सांगली, कुपवाड दि.०५/०७/२०२१

प्रति,

१. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली
२. मा. आयुक्त, सांगली- मिरज आणि कुपवाड, महानगरपालिका
३. मा. पोलिस अधिक्षक, सांगली
४. मा. जिल्हा कृषी अधिकारीसांगली,
५. जिल्हा रेशिम विभाग सांगली
६. कार्यकारी अभियंता सा.बां.वि.सांगली
७. कार्यकारी अभियंता सा.बां.वि.मिरज
८. सामाजिक न्याय व विशेष अर्थ सहाय्य विभाग, सांगली
९. समाज कल्याण विभाग, सांगली
१०. महिला व बालकल्याण जि.प. सांगली
११. जिल्हा उदयोग केंद्र, सांगली
१२. उपप्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.म.सांगली
१३. कार्यकारी अभियंता, म.औ.वि.म.सांगली
१४. उपप्रादेशिक परिवहन, कार्यालय सांगली
१५. विभागीय अभियंता,म.रा.प.म.सांगली
१६. जिल्हा दुग्ध विकास अधिकारी सांगली-मिरज
१७. जिल्हा क्रिडा अधिकारी, सांगली
१८. सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय, सांगली
१९. जि.व्य.शि.व प्रशि.अधिकारी सांगली
२०. महाप्रबंधक दुरसंचार कार्यालय, सांगली
२१. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग कोल्हापूर
२२. समाज कल्याण विभाग सांगली
२३. सार्वजनिक आरोग्य विभाग, सांगली
२४. राष्ट्रीय महामार्ग विभाग, कोल्हापूर
२५. पुणे गृहनिर्माण विभाग,सांगली
२६. सहा.कामगार आयुक्त कार्यालय सांगली
२७. जिल्हा व सत्र न्यायालय सांगली
२८. अधिक्षक अभियंता MSEB सांगली
२९. रेल्वे विभाग, मिरज
३०. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली
३१. जलसंपदा विभाग, सांगली
३२.जलसंवर्धन विभाग, सांगली
३३. राज्य उत्पादन शुल्क विभाग,सांगली

...त्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे
06 JUL 2021
आवक क्र. 4006

३५. पशूसंवर्धन विभाग जि.प.सांगली
३६. उपायुक्त पशूसंवर्धन विभाग राज्य
३७. शासकीय वैदयकीय महाविदयालय व रुगणालय, सांगली
३८. शिक्षणाधिकारी प्राथमिक विभाग जि.प. सांगली
३९. शिक्षणाधिकारी माध्यमिक विभाग जि.प. सांगली
४०. नगर विकास विभाग जि.प.सांगली
४१. सांगली, मिरज आणि कुपवाड महानगरपालिका
४२. जिल्हा कारागृह विभाग, सांगली
४३.सैनिक कल्याण विभाग, सांगली
४४. अन्न व औषध प्रशासन विभाग, सांगली
४५. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उदयोजकता मार्गदर्शन केंद्र,सांगली
४६. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४७. महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोदयोग मंडळ, सांगली

**विषय**- सन २०२१ च्या पावसाळ्यात लागवड करावयाच्या रोपांबाबत..
**संदर्भ**- महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग, शा.नि.क्र.सावनि-२०२१/प्र.क्र.२०/फ-११ दि.०४/०६/२०२१

दि. १ जुलै २०२१ ते ३० सप्टेंबर २०२१ हा कालावधी शासनाने वनमहोत्सव कालावधी म्हणून जाहिर केला आहे. सदर कालावधी दरम्यान वन विभाग व सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडून सर्वांना सवलतीच्या दरात रोपे उपलब्ध आहेत. तसेच ज्या शासकीय यंत्रणेकडे अनुदान उपलब्ध नाही अशा यंत्रणांना विहीत नमुन्यात अर्ज दिलेनंतर मोफत रोपे देण्याची तरतुद आहे. मोफत रोपे मागणीबाबतचा विहीत नमुन्यातील अर्ज सहपत्रित करणेत आलेला आहे. याबाबत संदर्भिय शासन निर्णयाचे कृपया अवलोकन करणेत यावे.

सद्यस्थितीत सांगली जिल्हयातील बहुतांश भागात चांगला पाऊस झाला असून वृक्ष लागवडीयोग्य परिस्थिती आहे. तरी जिल्हयातील वृच्छांदन वाढविण्याकरिता आपले विभागामार्फत उत्स्फुर्तपणे या कार्यात सहभागी व्हावे ही विनंती.

सर्व गांव/ तालुकास्तरीय यंत्रणांनी या कार्यालयात खड्डे खोदल्यानंतर रोपे मागणी अर्ज एकत्रित स्वरूपात जिल्हा प्रमुखांमार्फत अथवा कार्यालयनिहाय केला तरी चालेल, जेणेकरून त्याची दर गुरूवारी साप्ताहीक दखल घेऊन जवळच्या रोपवाटीकेतून दर शुक्रवारी रोपे वाटप करता येईल.

आपले अर्जाची मुळ प्रत व्यक्तीमार्फत तर अगाऊ सुचना म्हणून ई मेलद्वारेही देता येईल. त्याकरिता कार्यालयाचा ई मेल dycfsangli@gmail.com असा आहे. जिल्हास्तरीय कार्यक्रम नियंत्रण कक्षात उपलब्ध श्री. एस.एस. खोत, लेखापाल यांचेमार्फत अर्ज नोंद व वाटपाचे दस्तऐवज ठेवण्यात येत असून त्यांचा भ्रमणध्वनी क्र.९१७५४४२७६६ असा आहे.

(विजय माने)
**उपवनसंरक्षक,**
**वन विभाग, सांगली**

**प्रतिलिपी**- मा. जिल्हाधिकारी, सांगली यांना माहीतीसाठी सविनय सादर.

वन महोत्सव २०२१-२२
वन महोत्सव कालावधीत करावयाच्या
रोपांच्या वाटप व विक्री दराबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्र. साववि-२०२१/प्र.क्र.२०/फ-११,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ४ जून, २०२१.

वाचा :-

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. वनम २०१६/प्र.क्र.७१/फ-११ दिनांक : ४.६.२०१६
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. साववि २०२०/प्र.क्र.४३/फ-११ दिनांक : १५.६.२०२०
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे यांचे पत्र जा.क्र. कक्ष ३(ब)/राहसे/१६७/ सन २०२१-२२, दि.१७.५.२०२१
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र जा.क्र.कक्ष-१/ रोहयो/ प्र.क्र.१४( भाग-३)/४२/२१-२२, दि.२१.५.२०२१.

प्रस्तावना :-

दि. १५ जून ते ३० सप्टेंबर, हा काळ वन महोत्सवाचा काळ म्हणून दरवर्षी साजरा करणेत येतो. या कालावधीत वृक्षलागवडीसाठी लोकांना उद्युक्त करण्याच्या दृष्टीने शासनामार्फत सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा करण्यात येत असतो. वृक्ष लागवड व संगोपन हा लोकांचा कार्यक्रम व्हावा, त्याचबरोबर जनतेला वनीकरणाचे महत्व पटवून देता यावे. या दृष्टीने वन महोत्सवाच्या कालावधीत सुधारीत केलेल्या सवलतीच्या दराप्रमाणे रोपांचा पुरवठा केला जातो. त्यानुसार संदर्भ क्र. (२) येथील दिनांक १५ जून २०२० च्या शासन निर्णयान्वये सन २०२०-२१ साठी सदर योजना पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली होती. आता सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात सदर योजना चालू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

१. सन २०२०-२१ या वर्षातील अनुभव तसेच जनतेचा प्रतिसाद लक्षात घेऊन, ही योजना सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात **दिनांक १५ जून २०२१ ते ३० सप्टेंबर २०२१** या वन महोत्सवाच्या कालावधीत पुढे चालू ठेवण्यास व ती प्रभावीपणे राबविण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. राज्यात सन २०१७ पासून “५० कोटी वृक्ष लागवड” हा कार्यक्रम हाती घेण्यात आला होता. सदर कार्यक्रमांतर्गत सन २०१९-२० या वर्षासाठी ३३ कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करणेत आले होते. या वृक्षलागवडीचा कार्यक्रम अखंडपणे पुढे ही चालू राहावा व या कार्यक्रमांतर्गत खाजगी मालकीचे पडीक क्षेत्र आणि शेत बांधावर, रेल्वे दुतर्फा, कालवा दुतर्फा तसेच रस्ता दुतर्फा क्षेत्रात, सामूहीक पडीक क्षेत्र, व गायरान क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेता यावा. तसेच सर्व सामान्य शेतकरी व वृक्षप्रेमी यांना अल्पदरात रोपे उपलब्ध व्हावीत यासाठी वनमहोत्सवाच्या कालावधीत सवलतीच्या दरात रोपांचा पुरवठा करण्यात येईल. वन महोत्सवाच्या कालावधीत आणि सर्वसाधारण कालावधीत रोपांचा पुरवठा, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात पुढील तक्त्यात नमूद केलेल्या सवलतीच्या दराप्रमाणे करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | रोपांचे वर्गीकरण | वनमहोत्सव कालावधीतील रोप विक्रीचे दर प्रति रोप (रूपये) | सर्वसाधारण कालावधीतील रोप विक्रीचे दर प्रति रोप (रूपये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | ९ महिन्याचे रोप (लहान पिशवीतील रोप) (१२.५ सेमी × २५ सेमी) | १०/- | २१/- |
| २. | १८ महिन्याचे रोप (मोठ्या पिशवीतील रोप) (२० सेमी × ३० सेमी) | ४०/- | ७३/- |
| ३. | १८ महिन्याचे रोप (मोठ्या पिशवीतील रोप) (२५ सेमी × ४० सेमी) | ५०/- | १०५/- |

३. राज्यात सन २०२१ च्या पावसाळयात १५ जून ते ३० सप्टेबर या कालावधीत वृक्ष लागवड करणेसाठी सर्व शासकीय यंत्रणा व आस्थापना तसेच निमशासकीय यंत्रणा व लोकांना मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड कार्यक्रमात सहभाग घेता यावा. यासाठी वरीलप्रमाणे सवलतीचे दरात रोपांचा पुरवठा करण्यात येत आहे.

४. ज्या शासकीय यंत्रणांना वृक्ष लागवड करावयाची आहे. अशा यंत्रणांना रोप निर्मितीसाठी कोणत्याही प्रकारची आर्थिक तरतूद नसल्यास, अशा यंत्रणांना या वनमहोत्सव कालावधीत रोपांचा मोफत पुरवठा केला जाईल. यासाठी त्यांनी लागणा-या रोपांची आगाऊ मागणी नजीकचे उपवनसंरक्षक किंवा विभागीय वन अधिकारी,सामाजिक वनीकरण विभाग यांचेकडे सोबतच्या मागणी पत्राद्वारे करावी.

५. उपवनसंरक्षक/विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग हे जिल्ह्यात उपलब्ध प्रादेशिक/ सामाजिक वनीकरण रोपवाटीकेमधून यंत्रणानिहाय/ मागणीदार यांना रोप पुरवठ्याचे आदेश निर्गमित करतील व इतर यंत्रणेशी योग्य समन्वय साधतील.

६. संदर्भ क्र. १ मधील दि. ०४/०६/२०१६ रोजीच्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. १० मध्ये नमूद केल्याप्रमाणे वनमहोत्सव काळात वन व सामाजिक वनीकरण विभागाच्या रोपवाटीकांमधून सवलतीच्या दराने रोपांचा पुरवठा केला जातो. या योजनेचा फायदा सर्व संबंधित विभागांनी घ्यावा. जिथे अडचण असेल तिथे वन व सामाजिक वनीकरण विभागाकडून मोफत रोपे देण्याचा प्रयत्न केला जाईल. मात्र त्याबाबतची आवश्यक नोंद आणि लेखा, रोपे उपलब्ध करून घेणारा विभाग आणि रोपे उपलब्ध करून देणारा विभाग अशा दोन्ही विभागामार्फत ठेवण्यात यावे. याबाबतची माहिती व अहवाल प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचेकडे पाठवावी.

७. वनमहोत्सवाच्या कालावधीत (१५ जून ते ३० सप्टेंबर) वनमहोत्सवाचे प्रयोजन व महत्व याबाबत प्रभावीपणे सर्वदूर पोहोचणा-या माध्यमातून योग्य प्रसिद्धी देण्यात यावी. या बाबतचा खर्च "मागणी क्र.सी-७, मुख्य लेखाशिर्ष-२४०६ वनीकरण व वन्यजीवन-१०१-वन संरक्षण व विकास व पुनर्निमीत-(११) (३४) (२४०६ ८५५१) (योजनेंत्तर्गत) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सन २०२१-२२ वर्षाकरिता मंजूर केलेल्या निधीतून मागविण्यात यावा".

८. उपवनसंरक्षक (प्रादेशिक), विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण यांनी विक्रीतून एकूण जमा झालेला महसूल याबाबत चालू आर्थिक वर्षाचा तपशिल सोबतच्या विहीत नमून्यात प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करावा.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२१०६०४१२१५४७६६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arvind Shankar Apte

Digitally signed by Arvind Shankar Apte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0a68ee850c7ae56e3bbf1e252bef5c7e2ba3631df8eadfdcd47cdd3c33b91a1, cn=Arvind Shankar Apte
Date: 2021.06.04 12:26:03 +05'30'

(अरविंद आपटे)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रति,

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वन बल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) विभागीय आयुक्त सर्व.
५) मुख्य वनसंरक्षक / वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
६) वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण वृत्त कोकण-ठाणे/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
७) जिल्हा अधिकारी सर्व.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद (सर्व).
९) उप वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व.
१०) विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग (सर्व).
११) विभागीय वन अधिकारी /उप विभागीय वन अधिकारी (प्रादेशिक) सर्व.
१२) सहसंचालक (कृषी), सर्व.
१३) जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी सर्व.
१४) महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर.
१६) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
१७) अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.
१८) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१९) कार्यासन अधिकारी, व्यय-०६/अर्थ-१७, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२०) कार्यासन अधिकारी, ब-१ महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई-३२.
२१) अवर सचिव, फ-२, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
२२) निवडनस्ती/फ-११.

<u>महसूल व वन विभाग</u>

क्र. सावि-२०२१-/प्र.क्र.२०/फ-११, दिनांक ४/०६/२०२१ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | तयार करण्यात आलेल्या एकूण रोपांची संख्या (लाखात) | एकूण विक्री झालेल्या रोपांची संख्या (लाखात) | विक्रीतून वसूल झालेली रक्कम (रुपये हजारात) | शिल्लक राहीलेल्या रोपांची संख्या (लाखात) |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | | | | |

उप वनसंरक्षक (प्रादेशिक) / विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग.
जिल्हा ...............

## रोप मागणी पत्र / अर्ज

प्रति,
उपवनसंरक्षक **(प्रादेशिक)** / विभागीय वन अधिकारी,
सामाजिक वनीकरण विभाग,
.......................जिल्हा

विषय :- इतर शासकीय यंत्रणाद्वारे वृक्ष लागवडी करीता मोफत रोपांचा पुरवठा होणेबाबत.

महोदय,

मी.....................................................................................पदनाम.........
.............................जिल्हा यंत्रणाप्रमुख..........................प्रमाणित करतो की, शासन निर्णयानुसार वृक्ष लागवडीसाठी आमच्या .................यंत्रणेस..........................एवढया ठिकाणी---------एवढे खडडे खोदून ठेवलेले आहेत. तरी वृक्ष लागवडीसाठी ----------रोपांची गरज आहे.

१) सदर रोपे शासकीय दरात घेण्याकरीता आमच्या यंत्रणे जवळ रोपलागवडीकरीता अनुदान उपलब्ध नाही.
२) सदर रोपे खरेदी करीता आम्ही /इतर स्त्रोतातून प्रयत्न केला परंतु निधी उपलब्ध झालेला नाही.
३) आमच्याकडे कार्यालय खर्च व इतर किरकोळ खर्चाकरिता सुध्दा अनुदान उपलब्ध नाही.

करीता आम्हाला लागणारे..........................रोपे मोफत उपलब्ध करुन देण्यात यावे ही विनंती. उपलब्ध रोपे स्वतंत्र नोंदवहीमध्ये नोंद घेतली जातील व वरिष्ठ कार्यालयास याबाबत कळविण्यात येईल.

आपला,

दिनांक

स्थान

सही
नाव
पदनाम
जिल्हा